# खाजगी बँकांनी गोरगरिबांची वाट लावली गोरगरिबांवर संकटांची माळ?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १९० ■ शनिवार दि.२९ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 190 ■ Saturday Dt. 29 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4



# बीड जिल्ह्यातील सामान्य गोरगरिबांनी जास्त अमिषाला बळी पडू नका!

## जिल्ह्यात ठेवीदारांचा बळी ठरू शकतो, याला जबाबदार कोण राहाणार?

## अनेक ठेवीदारांवर आत्महत्या करण्याची वेळ; लक्ष घालण्याची गरज?

## जिल्हा उपनिबंधक सहकारी कार्यालय झोपेचे सोंग घेऊन गप्प का?

## खाजगी बँकांच्या मनमानीला जिल्हा प्रशासनाने आळा घालावा!

## खाजगी बँकांना मान्यता देणाऱ्या सि.ए. यांच्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अनेक महिला पतसंस्था निधी अर्बन, मल्टीस्टेटच्या माध्यमातून फोफावला आहे. परिणामी अनेकगुंतवणुकदारांवर कंगाल होण्याची वेळ आली आहे गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांना त्यांचा कष्टाचा पैसा परत मिळत नसल्याने मोठे आर्थिक संकट ओढावले आहे. गेवराई शहरातील एक नामांकित मल्टीस्टेटमध्ये आमिषपूर्ण मायाजालामुळे भांडवल धोक्यातजास्त व्याजदराची अपेक्षा ठेवून अनेकांनी आपल्या मेहनतीची कमाई मल्टीस्टेटच्या आमिषपूर्ण मायाजालाच्या हवाली केली, मात्र आता एक – एक करुन या मल्टीस्टेट गाशा गुंडाळत असून त्याकरिता उपनिबंधक सहकारी संस्थांच्या कार्यालयाकडून या खाजगी बँकांकडे लक्ष नसल्याचे दिसून येते.

ठेवीदारांचा जीव चांगलाच टांगणीला लागला आहे. बीड सह गेवराई शहरात अशाच प्रकारे स्वतःच्या हितासाठी ठेवीदारांची रक्कम वापरणारे स्वयंघोषित चेअरमन यांनी स्थानिक पुढारी, प्रतिष्ठीतांना हाताशी धरूनच वेगवेगळ्या नावाने पतसंस्था टाकल्या. काहीच दिवसात त्यात येथील अनेक प्रतिष्ठितांनी मोठया प्रमाणात गुंतवणूक केली. बीड जिल्ह्यात ज्ञानराधा, शुभ कल्याण, जिजाऊ, माँसाहेब, यास अनेक बँकांनी गोरगरीब ठेविदारांना मोठ्या प्रमाणात गंडा घातलाय त्यातच आता गेवराई तालुक्यात असाच प्रकारे मल्टीस्टेट निधी अर्बन मोठ्या प्रमाणात धोक्यात आल्याचे सांगितले जाते. प्रत्येक खातेदार आपल्या प्रत्येक खातेदार आपल्या अडी अडचणीत आपल्याला जमा केलेली रक्कम कुठेतरी लग्नकार्याला किंवा हॉस्पिटलला कामा येईल याकरिता या संस्थेत रक्कम जमा केली पण या संस्था चालकांनी स्वतःची दुकान उघडल्या सारखे धंदे केल्यामुळे गोरगरीब खातेदार अडचणीत सापडला आहे. खात्यावर असलेली रक्कम वेळेवर मिळत नसल्याने अनेक खातेदार अक्षरशा डोळ्याला पाणी येत आपला टाहो फोडत आहेत. पण या संस्थाचालकाच्या मनमानी कारभाराला कंटाळून काही खातेदार शेवटी आत्महत्या करण्याच्या दृष्टीने विचार करतात अतिशय खेदजनक आहे अनेक खाजगी बँकांकडून गेल्या सहा–सहा महिन्यापासून ऑडिट केले जात नसल्याने या लोकांचे बॅलन्स शीट जुळत नसल्यामुळे ही अडचण निर्माण झाली असावी सातत्याने बँकेत चकरा मारू मारू खातेदार कंटाळले तरीही काही बँकांकडून खातेदारांची असलेली रक्कम परत मिळत नाही त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन या संस्थाचालकांनी मार्च एंडचे ऑडिट केले नाही त्यावर कडक शासन करावे अशी मागणी होत आहे. बीड जिल्ह्यात ठेवीदारांचा बळी ठरू शकतो? याला जबाबदार कोण राहाणार, तसेच खाजगी बँकांच्या मनमानीला जिल्हा प्रशासनाने आळा घालावा अशी मागणी होत आहे. जिल्हा उपनिबंधक सहकारी कार्यालय झोपेचं सोंग घेतयं का? असा प्रश्न यानिमित्त उपस्थित केला जात आहे. अनेक ठेवीदारांवर आत्महत्या करण्याची वेळ आली असून, ठेवीदारांचे नेते सचिन उबाळे यांनी तात्काळ निर्णय घेऊन ठेवीदारांना न्याय मिळवून द्यावा, आणि खाजगी बँकांना मान्यता देणाऱ्या सि.ए. यांच्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी अशी, मागणी होत आहे.




### गेवराईत चार बँका बंद पडण्याच्या मार्गावर?

गेवराई शहरातील बीड –जालना हायवे रोडवर असलेल्या इंडिया बँकेच्या परिसरात एक महिला अर्बन व हैदराबाद बँकेच्या परिसरात एक नामांकित मल्टीस्टेट तसेच शास्त्री चौकातील निधी अर्बन, शिक्षकांची मल्टीस्टेट या बँकांची चर्चा सध्या सर्वत्र सुरू आहे. खाजगी बँकांकडून खातेदारांची रक्कम बँकेत अडकली असल्याने अनेकांना मोठ्या अडचणीच्या सामना करावा लागत आहे. सातत्याने खातेदार या संस्थेत आपली रक्कम काढण्यासाठी जात आहेत. परंतु ती रक्कम वेळेवर न मिळत असल्यामुळे या बँका येणाऱ्या काळात बंद पडू शकतात. असे मत खातेदार वर्ग व्यक्त करत आहे.

# अबब...! बीड तालुक्यात २० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार

## सात्रा पोत्रा साठवण तलाव भूसंपादनामधे १८९४ व २०13 या दोन्ही कायद्यानुसार दुहेरी मावेजा वाटप

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गुन्हेगारी सोबत भ्रष्टाचार पण खूप मोठ्या प्रमाणात बोकाळला आहे याकडे वरिष्ठ अधिकाऱ्याचे दुर्लक्ष होत आहे. भूसंपादन कायदा १८९४ अंतर्गत सात्रापोत्रा साठवण तलावासाठी जमीन संपादन करण्यात आली होती त्यामधे बीड तालुक्यातील मौजे १) पोत्रा, २) कुंभारी, ३) अंबीलवडगांव ४) मुर्शदपुर येथील जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. संपादित केलेल्या जमिनीच्या भूसंपादनामध्ये शेतकऱ्यांना ८०% आगाऊ रक्कम वाटप करण्यात आलेली आहे. अंतिम निवाडा २०%चा होणे अपेक्षित होते पण अंतिम निवाडा १००% करून शासनाची दिशाभूल करण्यात आली आहे. संचिका क्र. ३४/२००4 सात्रा पोत्रा साठवण तलावाचे मूळ निवाड्याचे आदेशाने १)०७/२००९, २)०९/२००९, १०/२००९ अश्या प्रकारे वेगवेगळ्या संचि करून भूसंपादन कायदा २०13 प्रमाणे निवाडे तयार करून मावेजा वितरित करण् आलेला आहे.

थोडक्यात या प्रकरणात भूसंपा कायदा – १८९४ आणि भूसंपादन कायदा प्रमाणे दुबार मावेजाचा लाभ घेतला आहे. सर्वोच्य न्यायालयात दाखल विशेष अनु याचिका (दिवाणी) क्र. ९०३६–९०३८/२० इंदोर विकास प्राधिकरण विरुध्द मनोहरलाल इतर प्रकरणी सर्वोच्य न्यायालयाच्या घटनापी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उ भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनिया २०13 च्या कलम २४ बाबत दिनांक ०६ मार्च २०२० रोजी विस्तुत दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने भूसंपादन कायदा १८९४ मध्ये खातेदारांना मावेजा वाटप केला असेल तर भूसंपादन कायदा २०13 प्रमाणे लाभ येणार नाही किंवा दुहेरी लाभ देता येणार नाही असे स्पष्ट नमूद आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या घटानापीठाने दिनांक ०६ मार्च, २०२० रोजी दिलेल्या न्यायनिर्णय विचारात घेता, मा उच्च न्यायालय, मुंबई तसेच मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद व नागपूर खंडपीठाने कलम २४ च्या अधारे ज्या बहुसंख्य भूसंपादन प्रकरणात संपादन प्रक्रिया व्यपगत केलेली आहे.



त्या सर्व प्रकरणांचे पुनरावलोकन करण्यास्तव सर्व जिल्हाधिका–यांनी आढावा घेऊन मा. उच्च न्यायालयात तातडीने पुनर्विलोकन याचिका (ठशळशु झर्शींळींळेप) दाखल करण्यात याव्यात सदर पुनर्विलोकन याचिकाद्वार ना. सर्वोच्च न्यायालयाच्या घटानापीठाने या संदर्भात दिलेला न्यायनिर्णय मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून त्यानुसार मा. उच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या निर्णयास स्थगिती मिळविण्यास्तव अथवा संबंधीत प्रकरणी सुधारीत आदेश पारीत करण्यास्तव मा. उच्च न्यायालयास विनंती करण्यात याची सदरह कार्यवाहीत कोणताही विलंब न करता प्राधान्याने करण्याबाबत संबंधीत जिल्हाधिकारी यांनी आपण या अधिनस्त उप–विभागीय अधिकारी / विशेष भूसंपादन अधिकारी यांना सक्त आदेश देण्यात यावेत असे शासनाने आदेशात नमूद केलेले आहे तसेच विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी ही आदेश देऊन ही संपादित संघ अथवा भूसंपादन अधिकारी कार्यवाही करण्यास टाळाटाळ करत आहेत.

### कोण कधी कसा घोटाळा करेल सागु शकत नाही

भूसंपादन कायदा १८९४ व २०13 अन्वये एकाच प्रकरणात दबार मावेजा वाटप शासनाचे निवाड्याप्रमाणे अंदाजे २० कोटी जादा रक्कम गेलेली आहे ती वसूल करण्यात यावी यासाठी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी विभागीय आयुक्त व अधिक्षक अभियंता गोदावरी विकास महामंडळ छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे पुराव्यानिशी तक्रार दाखल केली होती त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांनी जिल्हाधिकारी बीड व अधीक्षक अभियंता यांनी कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग बीड यांना चौकशीचे आदेश दिले आहेत.

– अजय सरवदे
जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (प)

# खुनाच्या आरोपातून आरोपीची झाली निर्दोष मुक्तता

केज । प्रतिनिधी

केज येथील प्रथम अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री.के.डी.जाधव साहेब यांनी सत्र प्रकरण नंबर १६४/२०२३ मधील आरोपी नामे राजू उर्फ



टुल्या शिंदे याची भा.दं.वि. चे कलम ३०२,३२३ च्या आरोपातून दि.२४ मार्च २०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ड.डी.एम. काजगुंडे यांनी काम पाहिले. या प्रकरणाची थोडक्यात माहिती अशी की, दिनांक २१ जानेवारी २०२२ रोजी संध्याकाळी सहा ते सातच्या सुमारास सखुबाई शिंदे यांना दारू पिण्यासाठी व गांजासाठी पैसे दे म्हणून आरोपीनामे राजू उर्फ टुल्या याने गळ्यामध्ये रस्सी बांधून आवळून ओढत तिच्या घरासमोरील म्हैस बांधण्याच्या झाडाशेजारी खाली पाडून दगडाने कपाळावर, नाकावर, हनुवटीवर मारून जखमी करून ठार मारले अशी फिर्याद फिर्यादीने पोलीस स्टेशन केज येथे गु.र.नं.१६/२०२२प्रमाणे फिर्याद दाखल केली.

त्यावरून आरोपीविरुद्ध भा.दं.वि.चे कलम ३०२,३२३ प्रमाणे गुन्ह्याची नोंद होऊन प्रकरणाचा तपास एपीआय एस.जी.मिसळे यांनी केला व आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात पाठवले. प्रस्तुत प्रकरणांमध्ये सरकारी पक्षाच्या वतीने एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीच्या वतीने ॲड. डी.एम.काजगुंडे यांनी साक्षीदारांचा घेतलेला उलट तपास व केलेला अंतिम युक्तिवाद ग्राह्य धरून मा.न्यायालयाने सदर प्रकरणातून आरोपी ची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ॲड. डी.एम. काजगुंडे यांनी काम पाहिले व त्यांना ॲड.एस.एम.हारे पाटील, ॲड.बी.आय.चौधरी, ॲड. ए.डी.राठोड, ॲड.अक्षय इंगळे, ॲड.अतुल शेरेकर, ॲड.रमेश शेंडगे यांनी सहकार्य केले.

# जागतिक मौखिक दिनानिमित्त होळ येथे मौखिक दंत आरोग्य शिबीर

केज । प्रतिनिधी

जिल्हा शल्य चिकित्सक बीड, राष्ट्रीय मौखिक आरोग्य अभियान जिल्हा कार्यक्रमाधिकारी डॉ. दबडगावकर सर तसेच उपजिल्हा रुग्णालय केज चे वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आदित्य दंत महा विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मौखिक दिनानिमित्त आयोजित सप्ताहाच्या निमित्ताने ग्रामीण भागा तील होळेश्वर विद्यालय होळ येथील विद्यार्थ्यांना दंत आरोग्य मौखिक आरोग्य याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करून उपस्थित १५० पेक्षाजास्त विद्यार्थिनींची दंत व मौखिक तपासणी उप जिल्हा रुग्णालयाचे वरिष्ठ दंतशल्य चिकित्सक डॉ. रमण दळवी यांनी केली. तसेच गरजू रुग्णांच्या दातांमध्ये



आवश्यक ते उपचार डॉ.रमण दळवी व आदित्य डेंटल कॉलेजचे डॉ.मंगेश अंधारे यांनी केले. या सर्व शिबिराच्यायशस्वी आयोजना करता जिल्हा रुग्णालय बीडचे दंत सहाय्यक श्रीकांत उजगरे शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक गण यांनी मोलाचे सहकार्य केले.

# चौसाळा येथील हजरत सैलानी बाबा उर्स संदलला आजपासून प्रारंभ

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथील उर्फ संदल निमित्त प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी २९/०३/२०२५ रोजी ७ वा. संदल चे आयोजन करण्यात आलेले आहे. या संदलनिमित्त नामांकित बँडचे भव्य सामने आयोजन करण्यात आले आहे. दीपक ब्रास बँड चौसाळा, अनमोल ब्रास बँड बीड, उस्मानशा ब्रास बँड छत्रपती संभाजी नगर, वीरभद्र ब्रास बँड अहिल्यानगर बँडचा भव्य मुकाबला होणार असून दि. २९ रोजी भव्य महाप्रसादाचे आयोजन हजरत सैलानी बाबा दरगाह बायपास चौसाळा या ठिकाणी करण्यात आले आहे ३० रोजी या ठिकाणी रंगणार असून तरी चौसाळा व चौसाळा परिसरातील मल्लांनी या कुस्ती सामन्याचा लाभ घ्यावा असे आवाहन हजरत सैलानी बाबा उर्स संदल कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मानवी हक्क अभियान यांचे धारूर तहसीलदारांना विविध मागण्या संदर्भात निवेदन

धारूर । प्रतिनिधी

मानवी हक्क अभियान हे १९९० पासुन मागासलेल्या समाजाच्या न्याय हक्कासाठी सातत्याने लढा देत असून शिक्षण, आरोग्य, रोजगार, दलित अन्याय अत्याचार, गायरान जमिनीवरील मालकी हक्क, अशा अनेक प्रश्नावर सातत्याने लढा देत आहे. समाजातील अनेक प्रश्न घेऊन मानवी हक्क अभियान च्या कार्यकर्त्यांनी धारूर तहसील कार्यालयात निवेदन सादर केले.

त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या ०१ ऑगस्ट २०२४ रोजीच्या न्याय निकालानुसार अनुसूचित जातीचे अ ब क ड आरक्षण वर्गीकरण तात्काळ करण्यात यावे. धारूर तालुक्यातील गायरान जमिनी कास्तकारांच्या नावे करण्यात याव्यात.



तालुक्यातील तांदळवाडी, आसर्डोह, भोपा, कोठांबिरवडी, येथील दलित स्मशान भूमी प्रश्न अजूनही प्रलंबित आहे, त्वरित मार्गी लावावा. तसेच संजय गांधी, श्रावण बाळ, निराधार योजनेचे डी.बी.टी. ऑनलाइन प्रोसेस प्रत्यक्ष गावात जाऊन करण्यात यावे. विधवा कुटुंब अर्थसाह्य योजनेची आर्थिक मदत तात्काळ देण्यात यावी. भोपा कारी तांदळवाडी आसोला कोथिंबीरवाडी पहाडी पारगाव येथील रोजगार हमी योजनेची कामे तात्काळ चालू करण्यात यावीत.रेशन कार्ड मोफत देण्यात यावे.

दलितांवरील वाढत्या अत्याचारती कमी करण्यासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी. इत्यादी प्रमुख मागण्या मानवी हक्क अभियानाच्या माध्यमातून धारूर तहसीलदारांना सादर करण्यात आल्या. यावेळी महादेव उमप, परमेश्वर आडागळे, किरण लोखंडे, अशोक पारवे, अंकुश लोखंडे, आकाश लोखंडे, मच्छिंद्र पाटोळे त्याचबरोबर मानवी हक्क अभियानाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# जि. प. प्रा. शाळा कुक्कडगाव शाळेतून अनिकेत आठवले नवोदय विद्यालयास पात्र

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील कुक्कडगाव जि. प. प्रा. शाळेचा इयत्ता पाचवीचा विद्यार्थी अनिकेत नितीन आठवले जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाला असून तो नवोदय विद्यालय प्रवेशास पहिल्याच निवड यादीत पात्र झाला आहे. या यशाबद्दल आणि त्याच्या वाढदिवसानिमित्त शाळेच्या आणि



ग्रामस्थांच्या वतीने शुभेच्छा देऊन अभिनंदन करण्यात आले. नितीन आठवले यांची मुलगीही याच शाळेतून नवोदय विद्यालयास पात्र झाली होती. आपल्या दोन्ही पाल्यांना चांगले शिक्षण देऊन त्यांच्या पंखाना बळ देणाऱ्या नितीन आणि महानंदाआठवले या पालकांचेही यावेळी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सतीश वटारे, सहशिक्षक जालिंदर गाडे, श्रीमती शोभा कुडके, कौशल्या राऊत,विजया बैरागी, पपीता चव्हाण, संगीता कुपकर अदि शिक्षकांसह, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नंदकुमार शिंदे, सर्व सदस्य, जेष्ठ नागरिक, पालक, विध्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी प्राचार्य शिवाजीराव नवरखेले यांना अमेरिकेच्या विद्यापीठाची डॉक्टरेट मिळाल्याबद्दल झाला सत्कार

केज । प्रतिनिधी

माजी प्राचार्य शिवाजीराव नवरखेले यांना अमेरिके तील वाशिंग्टन डिजिटल विद्यापीठाने शैक्षणिक व सामाजिक कार्याचीदखल घेवुन नवरखेले यांना डॉक्टरेट देवुन सन्मानित केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल ओम हंस योगाच्या प्रतिष्ठान आश्रम ब्रम्हपुरी ता.चाकुर यांच्या वतीने गुरुवर्य योगी अंतराम महाराज यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख



पाहुणे माजी शिक्षण सभापती राजेसाहेब देशमुख, न्यू.इंग्लीश स्कुल चे प्राचार्य प्रसाद नवरखेले, बाळासाहेब जगताप, सतिशराव जाधव, महादेव बरकते, डॉ.सुधीर आगळे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संजयकुमार पांचगे यांनी तर आभार प्रदर्शन गोविंद कांबळे यांनी केले.

# बुद्धगया महाबोधी बुद्ध विहारावर बौध्दाचा ताबा मिळेपर्यंत आंदोलन चालूच राहणार

माजलगाव । प्रतिनिधी

विश्ववदनिय तथागत महा कारणे गौतम बुद्ध यांना ज्या ठिकाणी संबोधित प्राप्त झाले ज्या ठिकाणी ज्ञान प्राप्ती झाली ते ठिकाण म्हणजे बिहार राज्यातील बुद्धगया होय बुद्धगया येथे पिंपळाच्या वृषखाली राजकुमार सिद्धार्थ ला ज्ञान प्राप्त देऊन तिथे सिद्धार्थ भगवान गौतम बुद्ध झाली त्या ठिकाणी जगातील महान सम्राट राजा अशोकाने बुद्ध धर्म स्वीकारल्यानंतर तिथे मोठे विहार बांधले ते विहार आज जगातील बौद्ध धर्मासाठी पवित्र आस्थेचा स्थान असून ते ब्राह्मण पुंजाराच्या ताब्यात आहे ते मुक्त होऊन बुद्धाच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी बी टी एम क्ट १९४९ हा कायदा रद्द करावा या मागणीसाठी संपूर्ण जगभर व संपूर्ण भारतभर आंदोलन चालू आहे हे विहार बुद्धांनी समतेची क्रांती केली व प्रतिक्रांतीनंतर ब्राह्मण महंतांनी त्यावर कब्जा मिळविला ते बुद्धाच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी सर्वप्रथम इ स १८१८ मध्ये भतेअनागरिक धम्मपाल यांनी आंदोलन केले व ते अनेक वर्ष चालू राहिले आणि त्यांचा परी परिपाक म्हणून बिहार टेम्पल ॲक्ट १९ ४९ हा कायदा आणून यामध्ये चार बौद्ध भिक्षू चार ब्राह्मण पुजारी व त्या विहाराचा अध्यक्ष हा बुद्धगया जिल्ह्याचा कलेक्टर जो की हिंदूधर्मीय ब्राह्मणच असला पाहिजे आणि तो जर ब्राह्मण नसेल तर चार ब्राम्हणांपैकी कोणीतरी अध्यक्ष असावा असा हा जाचक १९४९ चा बी टी एम ॲक्ट आहे विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर भारतातील बौद्ध धर्मात वाढ होऊन समाज जागृत झाला व भारत स्वतंत्र झाल्यानंतर संविधान लागू झाले आणि संविधानात स्पष्ट उल्लेख आहे की १९५० पूर्वीचे भारतातील जे जुने कायदे आहे ते रद्द समजण्यात आले असून भारताचा संविधानानुसार भारतातील सर्व कायदे व कानून लागू झाले आहेत त्याच तत्त्वावर बिहार राज्यातील बी टि ॲक्ट १९४९ रद्द करावा यासाठी माजलगाव जिल्हा बीड येथील बुद्धगया महाबोधी महाविहार आंदोलन कुर्ती समितीची स्थापना होऊन समितीचे अध्यक्ष विजय दादा साळवे यांनी ही माहिती सांगितली हो बी टी एम ॲक्ट १९४९ हा बिहार राज्यातील ज्याचं कायदा लागू असल्याने बुद्ध धर्माच्या संपूर्ण ताब्यात आलेले नाही म्हणून हे महाविहार संपूर्ण बौद्ध धर्माच्या ताब्यात यावे यासाठी भारतात प्रत्येक राज्यात आंदोलन चालू आहे व माजलगाव येथे सुद्धा गेल्या



पाच मार्च २०२५ रोजी माजलगाव तहसील कार्यासमोर संपूर्ण हजारो बौद्ध धर्माच्या वतीने तहसील कार्यालयासमोर घर मे आंदोलन करण्यात आले व दिनांक २८ मार्च २०२५ रोजी रास्ता रोको आंदोलन याची मागणीसाठी माजलगाव मध्ये करण्यात येणार होते परंतु जमाबंदी आदेश असल्यामुळे बीड जिल्ह्यात लागू असल्यामुळे तो रस्ता रोको आंदोलन रद्द करून पत्रकार परिषद घेण्यात आली हे सांगून रस्ता रोको पुढे करण्यात येणार आहे अशी ही माहिती बुद्धगया महाविहार आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष विजय दादा साळवे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली तर बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी हे विहार मुक्त करण्यासाठी केवळ भारतातच नव्हे तर जगभरात अमेरिका इंग्लंड थायलंड अशा अनेक देशात आंदोलने चालू आहे परंतु त्यांच्या बातम्या बाहेर देशातील न्यूज चैनल वर दाखवितात परंतु भारताचे दुर्दैव न्युज चैनल या बातम्या दाखवीत नाही तर भारतातीलच आंदोलनाच्या बातम्या सुद्धा आहे चैनल वाले दाखवीत नाही तर यापूर्वी समितीचे ज्येष्ठ नेते दयानंद स्वामी यांनी सांगितले की आपल्या प्रिंट मीडियाने आतापर्यंत आम्हाला अनेक आंदोलनामध्ये ते भूमिहीन आंदोलन असेल किंवा गायरान जमिनीचे आंदोलन असेल नामांतराचे आंदोलन असेल त्या प्रत्येक आंदोलनात आपला पत्रकार बांधवांनी आम्हाला सहकार्य केले आहे व बातम्यांना चांगल्या पद्धतीने प्रसिद्धी दिली आहे पुढेही आपले सहकार्य करावे असे आवाहन केले या पत्रकार परिषदेचे प्रास्ताविक ज्येष्ठ नेते कचरू तात्या खरे यांनी केली याप्रसंगी अंकुशराव जाधव सचिन बौद्ध महासभेचे जिल्हा अध्यक्ष एस बी मोरे धम्मानंद साळवे डॉ. श्रीराम खळगे पांडुरंग जाधव अविनाश जावळे रवींद्र टाकणखार दिपक टाकणखार सचिन उजगरे यांच्यासह बुद्धगया महाबोधी महाविहार आंदोलन कृती समितीचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोनीजवळा येथील जल जीवन मिशन योजनेच्या कामात अनियमितता

केज । प्रतिनिधी

मौजे सोनीजवळा ता. केज जि.बीड येथील जल जीवन मिशन योजने अंतर्गत जा.क्र मजिप्राम औ/ता.शा.३/२६१३ दि. १४/१२/२०२२ रोजी ४ कोटी तेरा लाख ५१हजार ४०० रुपयांची तांत्रिक मान्यता मिळाली. तसेच दिनांक १५ /१२ /२०२२ रोजी जा.क्र.ग्रा पा पु वी/लेखाकावी २०२२ क्रमांक ०३१४२/१५/१२/२०२२ नुसार प्रशासकीय मान्यता आदेश मिळाला व ४कोटी १३ लाख ५१ हजार ४०० दरडोई ५०१२ रूपये प्रमाणे तसा संबंधित कामाचा कार्यारंभ आदेश जाक्र /ग्रापापुवि/निविदा / कावी ९९३/क्र. ००७३९/३१/१/०२३ या प्रमाणे मे.कृष्णाई कन्स्ट्रक्शन जानेगाव तालुका केज जिल्हा बीड यांना त्याचा कार्यक्रम आदेश मिळाला परंतु संबंधित कामाचा कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून ते आज तागायत पर्यंत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड यांना वारंवार भेटून तसेच भ्रमणध्वनीद्वारे संबंधित अधिकारी उप अभियंता, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिप बीड जेई वापस कंपनीच्या अधिकाऱ्यांना वारंवार सांगून सुद्धा त्यांना तांत्रिक मान्यता प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेशात ज्या नियम अटी व शर्ती लेखी स्वरूपात घालून दिल्या आहेत. त्याचे कुठलेही पालन केलेले संबंधित कामात दिसून येत नाही तसेच संबंधित कामाच्या अंदाज पत्रकानुसार कोणतेही काम झालेले नाही संबंधित कामांमध्ये जी मोजमाप पुस्तिका लिहिलेली आहे अथवा आजपर्यंत जे बिल सदरील कामाचे उचलले आहे त्यामध्ये व प्रत्यक्ष कामांमध्ये तफावत असल्याचे जाणवत आहे.

सदरील कामाचे पाईप लाईनचे काम अद्याप पर्यंत निम्म्यापेक्षा जास्त अपूर्ण आहे पाईपलाईन साठी खोदकाम सुद्धा अंदाज पत्रकाप्रमाणे केलेले नाही. सदरील कामात खूप मोठ्या प्रमाणात अनियमित्ता झाली असून एकही काम अंदाज पत्रकानुसार अथवा मोजमाप पुस्तिकेत जे बिल रेकॉर्ड लिहिलेलेआहे त्याचा कुठेही ताळमेळ बसत नाही व गाडलेले पाईप निकृष्ट दर्जाचे असून पाण्याच्या टाकीचे काम गेल्या दहा ते बारा दिवसा पूर्वी सुरू केले असून ते अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे संबंधित कामाच्या तपासणी कामी चौकशी समितीने म्हणून चित्रीकरणासहित (इन कॅमेरा) याची चौकशी करावी तसेच शासनाची व सोनीजवळाग्रामस्थांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या संबंधित कंपनीस ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील अधिकारी अभियंता व संबंधित काम करत असलेल्या कंस्ट्रक्शन कंपनी विरोधातशासनाची व ग्रामस्थांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी चौकशी समिती नेमून इन कॅमेरा चौकशी करून संबंधितावर फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हेदाखल करावेत तसेच संबंधित काम दि.१५ एप्रिल पूर्वी पूर्ण करून गावाचा व माता–भगिनींचा पाण्याचा प्रश्न मार्गी काढावा.जर



येत्या दि.१५ एप्रिल२०२५ पर्यंत संबंधित चौकशी करून योग्य ती कार्यवाही केली नाही तर त्यानंतर दि.१५ एप्रिल नंतर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल तरी आपणाकडून अपेक्षा बाळगतो की आपण शासनाची व गावकऱ्याची फसवणूक करून गावकऱ्यांची गेल्या दोन वर्षापासून पाण्यासाठी हाल करणाऱ्या अधिकारी वापस कंपनी व गुत्तेदार यांच्यावर योग्य ती कार्यवाही कराल असे निवेदन दादासाहेब शंकरराव ससाने, अरुण व्यंकटी करपे, शिवाजी रामदास गायकवाड, प्रताप अशोक वैरागे ग्रामपंचायत सदस्ययांच्या वतिने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना निवेदन देण्यात आले आहे.

# महिला आणि युवकांनी कालव्याच्या पाण्यात उतरू नये

## गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांचे आवाहन

गेवराई । प्रतिनिधी

जायकवाडी धरणाच्या उजव्या कालव्यात सध्या पाण्याचे आवर्तन सुरु असून पाण्याच्या प्रवाहाला मोठा वेग आहे. काही हौशी युवक पोहण्यासाठी आणि माताभगिनी कपडे धुण्यासाठी कालव्यात उतरताना दिसत आहेत. पाण्याचा प्रवाहाचा अंदाज न आल्यामुळे मागील आठवड्यात दोन युवकांना प्राण गमावण्याची दुर्दैवी घटना घडलेली आहे. त्यामुळे युवक मित्रांनी आणि माताभगिनींनी पैठण उजव्या कालव्याच्या पाण्यात उतरू नये, पोहण्याच्या क्षणिक आनंदाच्या मोहापायी स्वतःचे आयुष्य उध्वस्त करून नका असे भावनिक आवाहन गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या पैठण उजव्या कालव्यामधील पाण्यात बुडून मागील आठवड्यात दोन तरुणांचा मृत्यु झाला. या दुर्दैवी घटनेनंतरही कालव्यात पोहणे आणि कपडे धुण्याचे प्रकार थांबत नाहीत, या पार्श्वभुमीवर आ.विजयसिंह पंडित यांनी त्यांच्या सोशल मिडीयाद्वारे मतदार संघातील नागरीकांना कालव्याच्या पाण्यात उतरू नका असे भावनिक आवाहन केले आहे. या बाबत बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यातून पाण्याचे आवर्तन सुरु आहे. दि.५ एप्रिलपर्यंत हे आवर्तन सुरु राहणार असून पुन्हा दि.२५ एप्रिल पासून दुसरे व त्यानंतर आणखी एक



आवर्तन मिळणार आहे. पैठण उजव्या कालव्याच्या वहन क्षमता पुर्नस्थापित करण्याची कामे मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे सध्या सुमारे १४०० क्युसेस पाणी कालव्यातून वाहत आहे. मौजे तळणेवाडी, धोंडराई या भागात कालव्यातील पाण्याची उंची सुमारे १० फुट असून तलवाडा, रामपुरी या भागात ती थोडी कमी होते. त्याचबरोबर पाण्याच्या प्रवाहाचा वेग प्रचंड आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे हौशी युवक आणि विद्यार्थी कालव्याच्या पाण्यामध्ये पोहताना दिसतात. आ.विजयसिंह पंडित रामपुरी व परिसरातील गावांच्या दौऱ्यावर असताना त्यांना काही युवक पाण्यात पोहताना दिसून आले.

पुढे बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, आपले जीवन अमुल्य आहे, घरी कोणीतरी आपली वाट पाहत आहे. आयुष्य खूप सुंदर असून जग आपल्याला पहावयाचे आहे. त्यामुळे क्षणिक आनंदाच्या मोहापायी आपले जीवन उध्वस्त करून घेवू नका, तुमच्या जाण्याने परिवारातील इतरांना सुध्दा त्रास आणि दुःख होणार आहे. त्यामुळे कालव्यात पोहण्यासाठी उतरू नका. युवकांबरोबरच माय-माऊल्यांना सुध्दा विनंती आहे, अनेक माताभगिनी कपडे धुण्यासाठी कालव्यात उतरत आहेत. कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे पूर्ण झाल्यामुळे कालव्याचा पृष्ठभाग निसरडा झाला आहे. त्यामुळे पाय घसरून पाण्याच्या प्रवाहात वाहून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे काळजी घ्या. कोणीही कालव्याच्या पाण्यात उतरण्याचा प्रयत्न करू नका, आपले जीवन अमुल्य आहे त्याचा आनंद घ्या असे भावनिक आवाहन शेवटी आ.पंडित यांनी केले आहे.

मागील आठवडाभरात कालव्यात पोहण्यासाठी गेलेल्या दोन युवकांचा पाण्यात वाहून गेल्यामुळे मृत्यु झाल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. कालव्यातील पाण्याच्या प्रवाहाचा वेग वाढलेला आहे. त्याचा अंदाज येत नाही त्यामुळे सराईत पोहणाऱ्यांना सुध्दा धोका निर्माण होतो. या दुर्दैवी घटनांमध्ये मृतदेह काढताना सुध्दा अनेक अडचणी समोर आलेल्या आहेत. या पार्श्वभुमीवर आ.विजयसिंह पंडित यांनी केलेल्या आवाहनाला महत्व आहे.



बीड नगर परिषदेच्या वतीने पवित्र रमजान ईद निमित्त शहरातील हत्ती खाना येथील हजरत शहा शमशोद्दीन दर्गा कब्रिस्तानची साफसफाई करण्यात आली. यावेळी उपस्थित मुकदम पप्पू साळवे, शुभम गायकवाड, सचिन ससाने, सचिन मोरे, पप्पू डोळस, सिद्धार्थ वाघमारे, मधुकर सुरवसे, भालेराव सह इतर सफाई कामगार मोठे संख्येने उपस्थित होते.

# लोकशाही पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी शुभांगी पाटील

पुणे । प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार महाराष्ट्र राज्य उद्योग विकास समितीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड श्रद्धा कंडूडे प्रदेश अध्यक्ष, संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती, पांडुरंग साळुंके पुणे जिल्हा अध्यक्ष यांनी संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, आयेशाखान मुलानी, निलोफर शेख प्रदेश अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, साजेद सय्यद, अनिस कुरेशी यांच्या आदेशानुसार केली.

या यावेळी संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य म्हणाले की, पाटील ह्या ब्युटी पार्लर, टेलरिंग क्षेत्रात कलासेस च्या माध्यमातून महिला आपल्या पायावर उभा करीत आहेत. गारमेंट क्षेत्रातील मोठं क्लस्टर उभा करून अनेक महिलांना रोजगार निर्मिती करणार आहे. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन निवड केली आहे. तसेंच लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य पत्रकारांच्याआणि महाराष्ट्र मधील तमाम सर्व सामान्य नागरिकांचे देखील विविध मागण्या शासन दरबारी मांडून



मंजूर करून घेणार आहेत. विविध समित्या स्थापन करून महाराष्ट्र राज्यात तालुक्यात सर्वत्र विकास केला जाईल. विविध कार्यक्रम साजरे केले जातील. एक वेगळा ठसा उमटवण्याचा लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल.

नवनिर्वाचित पदाधिकारी शुभांगी पाटील म्हणाल्या की, पुणे शहर सह संपूर्ण महाराष्ट्र मध्ये उद्योग क्षेत्रात मोठी क्रांती उद्योग उभारून करू. महिलांना विविध उद्योगाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक सक्षम करू. मला खात्री आहे की, शासन सर्वतोपरी सहकार्य करील, असेही निवडी प्रसंगी त्या म्हणाल्या होत्या. शब्द सुमानाने पाटील यांचा सत्कार करून संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती सुनंदा केदार, मराठवाडा उपाध्यक्ष दत्ता भाऊ नरनाळे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य, संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती मनमोहन तोमर नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष, शिवराज बिराजदार सोलापूर शहर उपाध्यक्ष, नवी मुंबई सरचिटणीस बालाजी सूर्यवंशी, लक्ष्मण भोसले - सोलापूर शहर सचिव, जस्मित तोमर - नवी मुंबई महिला आघाडी, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती श्रद्धा कंडूडे, मराठवाडा युवक अध्यक्ष दिपक भाऊ थोरात,प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

# आचार्य टाकळी येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची १९८ वी जयंती निमित्त कार्यकारणीची बैठक संपन्न

### अध्यक्षपदी नारायण खोडवे तर उपाध्यक्षपदी केशव खोडवे व सचिव महादेव खोडवे यांची निवड

सिरसाळा । प्रतिनिधी

मोजे टाकळी येथे समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांनी पहिली मुलींची शाळा काढणारे समाज सुधारक. महात्मा. ज्योतिबा फुले यांची. १९८ वी रोजी जयंती उत्सव. ११.४.२०२५. रोजी मोठ्या थाटामाटात निघणार आहे. यावेळी समितीची कार्यकारणी बैठक संपन्न करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये सर्वांचे एकमताने निवड करण्यात आली आहे. अध्यक्षपदी नारायण खोडवे तर उपाध्यक्षपदी केशव खोडवे व सचिव पदी महादेव जिजा खोडवे यांची निवड करण्यात आली. त्यांचा सत्कार व स्वागत करण्यात आला आहे.





आचार्य टाकळी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्सव मोठ्या थाटामाटा ११ एप्रिल या दिवशी भव्य मिरवणूक व रक्तदान शिबिर घेतले जाणार आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. तरी रक्तदान करणाऱ्या युवा कार्यकर्त्यांनी रक्तदान करून एखाद्या गरजू व्यक्तीला तुमच्या रक्तदानाने जीवदान मिळत असेल तर त्यांच्या एवढं मोठं दान कोणतच दान नाही यासाठी रक्तदान करावे ही जयंती कमिटीच्या वतीने विनंती करण्यात येत आहे.

यावेळी सामाजिक उपक्रम राबवले जातात गरजू विद्यार्थ्यांना व विद्यार्थ्यांना शाळेतील वही पेन पुस्तक याचे वाटप केले जाते असे उपक्रम या जयंतीनिमित्त गावातील युवा कार्यकर्त्यांनी परिश्रम हाती घेतले आहे. पुणे येथे आपल्या वाड्यातील पाणी पिण्याचे आड खुला करणारे पहिले महात्मा. समाज सुधारक. महात्मा. ज्योतिबा फुले हे होते.

यावेळी उपस्थित या कार्यक्रमाचे संयोजक व या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिलेले समाज बांधव तुकाराम खोडवे. सतीश खोडवे. शरद खोडवे. केशव डाके. बबलू आरसुळे. बाळू आरसुळे. अमोल खोडवे. चंदू भैया खोडवे. भगवान खोडवे. भगवान तळेकर. महेश खोडवे बाळासाहेब डाके. पांगरकर भैया. विजय खोडवे. वैजनाथ खोडवे. बळीराम खोडवे. गोपाळ डाके मदन खोडवे. सचिन खोडवे यांच्या एक मताने अध्यक्ष. व उपाध्यक्ष. व सचिवपदी. निवड करण्यात आली.

# ईदच्या तयारीसाठी बीड शहरात पाण्याचा विशेष पुरवठा करण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

मुस्लिम समाजाचा पवित्र सण ईद उल-फितर सोमवारी (३१तारखेला) साजरा केला जाणार आहे. ईदच्या तयारीसाठी पाण्याची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता असते. त्यामुळे बीड शहरातील हाफिज मन्सूर यांनी प्रशासनाकडे एक दिवस आधी विशेष पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे.



नागरिकांचे म्हणणे आहे की, ईदसाठी घरोघरी साफसफाई, स्वयंपाक आणि विविध तयारी केली जाते, ज्यासाठी भरपूर पाणी लागते. सध्या अनेक भागांत पाणीपुरवठा अनियमित होत असल्याने सणाच्या दिवशी अडचणी येऊ शकतात. त्यामुळे प्रशासनाने लक्ष घालून रविवारीच पुरेसा पाणीपुरवठा करावा, अशी ही मागणी आहे.

या संदर्भात काही स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनीही नगरपालिका व पाणीपुरवठा विभागाला निवेदन दिले असून, मुस्लिम समाजाच्या भावनांचा आदर ठेवून प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, असे आवाहन हाफिज मन्सूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नेकनूरसह परिसरात पाण्याची भिषण टंचाई

### प्रशासनाने तात्काळ टँकर मंजूर करावेत : सचिन शिंदे

नेकनूर । प्रतिनिधी

उन्हाळा सुरु झाला असून नेकनूर व परिसरातील जलस्त्रोत आटले आहेत. बोअर, विहिरी कोरड्याठाक पडल्याने सद्यस्थितीत नागरिकांना पाणीबाणीचा सामना करावा लागत आहे. गावासाठी पाणी पुरवठा करणारे भंडारवाडी तलाव कोरडे ठाक पडले आहे. नेकनुरसाठी सात्रा-पोतरा साठवण तलावात पाणी आहे. मात्र जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणी पुरवठा योजनेचे काम अजूनही पूर्ण झाले नाही.असे असताना गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी प्रशासनाने तात्काळ टँकर मंजूर करून द्यावेत. नेकनूर येथे भीषण पाणी टंचाईच्या झळा बसत आहेत. बीड तालुक्यातील सर्वात मोठी असलेली बाजारपेठ आणि सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे गावात जवळपास ३५ हजार लोकसंख्या आहे. या गावाला भीषण पाणी टंचाईच्या काळात टँकर ची आवश्यकता आहे. नागरिकांना पाण्यासाठी तारेवरची कसरत करण्याची वेळ आली असल्याने प्रशासनाने तात्काळ दखल घेवून टँकर मंजूर करून नागरिकांची होणारी गैरसोय थांबवावी अशी मागणी नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केली आहे.



# राज्यातील ५६० गोशाळांना देशी गोवंश परिपोषण योजनेचा लाभ वितरण म्हणजे नवसंजीवनी : ढाकणे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी विराजमान झालेले जेष्ठ समाजसेवक सन्माननीय शेखर भाऊ मुंदडा यांनी महाराष्ट्र राज्यातील गोमाता संकटात सापडलेल्या आहेत हे हेरले व गोमातांच्या संगोपनासाठी काही तरी आगळीवेगळी योजना सुरू करण्याचे ठरविले आणि मागिल २ वर्षांपासून अहोरात्र परिश्रम घेत देशी गोवंश परिपोषण योजना कार्यान्वित करण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी व मंत्री महोदय यांच्या सोबत चर्चा करून योजना सुरू केली. या योजनेचा लाभ म्हणून महाराष्ट्र राज्यातील ५६० गोशाळांना गुरुवार दिनांक २७ मार्च रोजी जानेवारी, फेब्रुवारी व मार्च या ३ महिन्यांचे अनुदान म्हणून २५ कोटी रुपये संबंधित गोशाळांच्या बॅक खात्यांवर



ऑनलाईन पद्धतीने जमा करण्यात आले आहेत. याबद्दल महा एनजीओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य चे बीड जिल्हा समन्वयक श्री बाजीराव ढाकणे यांनी सन्माननीय शेखर भाऊ मुंदडा यांचे आभार मानले आहेत.

गोशाळांमधील देशी गार्यींच्या पालन पोषणासाठी प्रति दिन प्रति गाय ५० रुपये अनुदान योजनेअंतर्गत दि २७ मार्च २०२५ रोजी राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६५६९ गार्यींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६९ हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत ऑनलाईन पद्धतीने लाभार्थी गोशाळांना वितरित करण्यात आले.

देशी गार्यींची कमी झालेली उत्पादन क्षमता, त्यांचे संगोपन तसेच भाकड किंवा अनुत्पादक गार्यींचे संगोपन करण्यासाठी पशुपालकांना येणार्या अडचणी लक्षात घेऊन गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या हेतुने सन २०२४- २०२५ मध्ये महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असणार्या गोशाळांना शासनाने गोवंश परिपोषण योजना सुरु केली.अनेक गोशाळांना यातून फायदा तर झाला आहेच त्यासोबतच देशी गोवंश संगोपनामध्ये मदत झाली आहे.

या महत्वपूर्ण योजनेच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस साहेब, पशुसंवर्धन मंत्री मा.पंकजाताई मुंडे व महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष राज्यमंत्री दर्जा सन्माननीय शेखर भाऊ मुंदडा तसेच सर्व प्रमुख अधिकार्यांचे महा एनजीओ फेडरेशन चे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

> ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा कणा असणार्या देशी गोवंशाला या योजनेच्या लाभामुळे मिळणारी नवसंजीवनी येणार्या काळात देशी गोवंश वृद्धीसाठी आणि संगोपन - संवर्धनासाठी फायद्याची ठरेल.
>
> - बाजीराव ढाकणे, सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा समन्वयक, महा एनजीओ फेडरेशन, महाराष्ट्र

# ‘गेवराई’च्या संजय गांधी विभागातील मोरक्याने केले निराधारांना ‘अनाथ’?

## तहसीलमध्ये खरे लाभार्थी अक्षरश, दारात झोपले!

**गेवराई येथील संजय गांधी व श्रावण बाळ विभागातील कर्मचाऱ्यांना दलालांची साथ मिळते. त्यांचे वरिष्ठ अधिकारी सातत्याने कानाडोळा करत आहेत. या प्रथेमुळे सर्वसामान्य निराधारचे हाल मोठ्या प्रमाणात होत आहे. या कार्यालयात आर्थिक देवाणघेवाण केल्याशिवाय कुठलेही काम होत नसल्याने निराधार यांना हे अनुदान नकोसे झाले आहे. एका शहाण्याच्या सीएससी केंद्रावरून या व्यवहाराचा कारभार चालतो अशी चर्चा रंगत आहे. खरा माणूस म्हणून या कार्यालयात कुणीच वावरत नाही.**

**आडे-मुद्दा क्रॉस**

कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून दलाल यांचा कारभार हाकला जात आहे. त्यामुळे रॅकेट सक्रिय झाल्याने हे काम अहोरात्र केले जाते. विशेष म्हणजे दलाल यांच्या रॅकेटमध्ये अनेक महिला पुरुष असल्याने हे आश्चरचिकित करणार ठरतंय, निराधार लाभार्थ्यांना शिकार समजून कंत्राटी कर्मचारी हवा की सव्वा पैसे घेण्याचे काम करत असताना नुसता त्यांना या लाभातून वगळायचे आणि जो पैसे देईल त्यालाच लाभ घ्या, योजनेतून द्यायचा असा प्रकार वारंवार या कार्यालयातून होतो.

पैसे उकळण्याचे प्रकार वाढल्याने माय-बाप निराधार बांधवांना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. दलाल वर्तुळ लाभार्थ्यांच्या विस्तारात आहे. अनेक अधिकारी कर्मचारी यांचा आशीर्वाद घेऊन कंत्राटी कर्मचारी अनेक गैर कारभार करतात. लाभार्थ्यांना अमिष दाखवून तुमचे रखडलेले काम करून देतो, या विभागातील अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे काही अर्ज तलाठ्याकडे पडून आहेत कार्यालयीन वेळेत न येता अवोजाओ घर तुम्हारा अशी स्थिती त्या ठिकाणी पाहायला मिळते. तहसीलदार खोमणे या विभागाची कुठलीही चौकशी न करता त्यांना पाठबळ देतात की काय असा प्रश्न निर्माण होतो. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कारभारामुळे लाभार्थ्यांचे नुकसान होते. या कार्यालयाच्या दरात दररोज फेऱ्या मारण्यापेक्षा लोक दलालांना अधिक पसंत करतात ही वेळ का आली असावी



याकडे महसूल प्रशासनासह तहसीलदार महोदयांनी लक्ष घातले पाहिजे.

गेवराई तहसील कार्यालयातील संजय गांधी विभागातील मोरक्यालाआवर घाला. या कंत्राटी अधिकाऱ्यांची खांदेपालट करून तिथे महसूल सेवकांना आयडी देऊन काम गतीने करावे अशी मागणी निराधारांची आहे.



## ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या परिपूर्णतेसाठी आवश्यक असलेली कामे करा

बीड । प्रतिनिधी

शहराची ऐतिहासिक ओळख असलेल्या कारंजा टॉवरच्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी प्रशासकीय स्तरावर कामे करण्यात यावी याकरिता मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार आणि पोलीस अधीक्षक यांना कार्य करणे आवश्यक असलेल्या मुद्द्यांच्या यादीचे निवेदन दिले आहे.

**जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार, पोलीस अधीक्षक यांना निवेदनातून दिली कामांची यादी**

याविषयी दिलेल्या निवेदनात कारंजा टॉवरचे तुटलेले दार बदलून नवीन दार लावणे, बंद पडलेल्या घड्याळी सुरू करणे, इमारतीला आतून बाहेरून रंगरंगोटी करणे, इमारतीवर चारही बाजूने प्रकाश टाकणारे हाय मास्ट दिवे लावणे, जवळील दोन्ही झाडांच्या टॉवर ला चिटकलेल्या फांद्या छाटणे, कारंजा टॉवरच्या चारही बाजूने लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करणे, इमारती समोर तसेच या परिसरात डिजिटल होर्डिंग लावण्यास कायमस्वरूपी कडक बंदी घालणे, कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक प्रतिबंधक सक्तीच्या कारवाया करणे, इमारतीच्या पश्चिम आणि उत्तर बाजूच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे, कॉंक्रिटीकरण झाल्यावर पश्चिम व उत्तर बाजूस दक्षिण बाजू सारखे सिमेंटचे बाकडे ठेवणे, कारंजा टॉवरची देखभाल आणि सुरक्षेकरिता बीड नगर परिषदेचा प्रत्येकी किमान एक-एक कर्मचारी दिवस-रात्र कायमस्वरूपी नियुक्त करणे आदी कामे प्रशासनाने युद्ध पातळीवर करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. तसेच नागरिकांच्या पुढाकारातून सिमेंट चे १० बाकडे कारंजा टॉवर परिसरात ठेवण्यात आले आहे. पाण्याचे फवारे उडविणारी मोटार लावण्यात आली आहे. पाण्याच्या फवाऱ्यासाठी रंगबिरंगी लाईटस् लावण्याचे कार्य कार्यान्वित करण्यात आले आहे. यामुळे इमारत व परिसर आकर्षक दिसू लागल्याचे ही म्हटले आहे.

### ग्रामसेवक गीते, गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करणार का?

## पहाडी पारगाव येथील रस्त्यावर केले अतिक्रमण

धारूर । प्रतिनिधी

किल्लेधारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील सार्वजनिक रस्त्यावर केलेल्या अतिक्रमण काढण्यासाठी यापूर्वीही गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामसेवक गीते यांना निवेदन दिले होते परंतु त्यांनीही ग्रामपंचायत हद्दीतील कसल्याही प्रकारचे अतिक्रमण न काढल्यामुळे चंद्रसेन पाटोळे हे आमरण उपोषणास बसणार असल्याबाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांनी ग्रामसेवक गीते यांना पत्राद्वारे कळवले होते.

अधिक माहिती अशी की धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील ग्रामपंचायत हद्दीमधील रस्त्यावर केलेले अतिक्रमण धारक यांना गावातील जेष्ठ मंडळींनी अनेक वेळा सूचना देऊन सुद्धा ते अतिक्रमण काढलेले नाही व दिवसेंदिवस ते अतिक्रमण वाढतच असल्याकारणाने चंद्रसेन पाटोळे यांनी दहा मार्च २०२५ रोजी गटविकास अधिकारी यांना निवेदन दिले होते त्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामसेवक गीते यांना आदेश देऊन सदरील अतिक्रमण हे हटवण्यासाठी कळवले होते परंतु गीते यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही न केल्यामुळे गटविकास अधिकाऱ्यांनी पुन्हा एकदा गीते यांना पत्राद्वारे कळवले आहे व हे अतिक्रमण लवकरात लवकर न हटवल्यास चंद्रसेन पाटोळे डेमोक्रॉसाईट पार्टी ऑफ इंडिया तालुकाध्यक्ष धारूर हे उपोषणास बसणार आहेत असे दिनांक १८ मार्च २०२५ रोजी च्या पत्रात कळवले होते.

त्यावर त्यांनी उपोषणास बसू नये असे गटविकास अधिकारी यांनी कळवले असून ग्रामसेवक यांना योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. ग्रामसेवक या आदेशाची अमलबजावणी करतात का परत केराची टोपली दाखवतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# धारूर आगाराचा भोंगळ कारभार

## धारूर आगाराच्या बस खिळखिळ्या; इतर वाहनांना होऊ शकतो धोका

धारूर । प्रतिनिधी

धारूर येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या धारूर आगारांमधील बस या खिळखिळ्या झालेल्या असून त्यामुळे इतर वाहनांना व इतर प्रवाशांना धोका होऊ शकतो, या गाड्यांमधील काही गाड्यांचे छप्पर गायब झालेले आहे तर काही बस गाडीचे दरवाजे दोरीने बांधलेले आहेत काही खिडक्यांना काच नाहीयेत अशा अनेक समस्यांना धारूर तालुक्यामधील प्रवाशांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे धारूर तालुक्यातील प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होताना दिसत आहे.




महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या धारूर बस आगारातील एसटी क्रमांक एम एच ०९एफ एल ०३२३ मुंबईवरून धारूर येथे शनिवारी सकाळी दहाच्या दरम्यान आली असता या गाडीला पाठीमागच्या बाजूचे पूर्णपणे पत्रा लोंबत असलेला दिसून येतो. त्या पत्र्याच्या लोंबकळत्या पणामुळे इतरांना धोका होऊ शकतो किंवा तो पत्रा इतरांना लागून अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही तसेच धारूर आगारातील अनेक बस गाड्या खिळखिळ्या झालेल्या आहेत यावरून असे लक्षात येते की धारूर आगारातील बस गाड्या या निकृष्ट दर्जाच्या आहेत व त्या गाड्या तात्काळ दुरुस्त करून घ्याव्यात असे प्रवाशांमधून बोलले जात आहे.

> धारूर आगारात नवीन बसेस लवकरात लवकर आणाव्यात कारण जुन्या झालेल्या बस हे मोडकळीस आलेल्या आहेत त्या बसेस मध्ये कसल्याही प्रकारची सुविधा आढळून येत नाही व रस्ते हे गुळगुळीत झालेले असताना देखील लांब पल्ल्याच्या प्रवास करता वेळेस लोकांना कमरेचा त्रास सुद्धा जाणवत आहे.
>
> – अक्षय अंधारे, प्रवासी

# तलावातील मोटारी काढल्याने संभाव्य पाणीटंचाई तूर्तास टळली

## जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला काकडहिरा ग्रामस्थांचा सकारात्मक प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील काकडहिरा तलावातून मोटारी काढून घेण्यासाठी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाच्या वतीने ग्राम महसूल अधिकारी बंडू आगलावे, राजुरी विभागाचे मंडळ अधिकारी प्रभू येवले, ग्रामविकास अधिकारी श्री गिरी तसेच उपअभियंता ल.पा.जिल्हा परिषद बीड पठाण, कनिष्ठ अभियंता जिल्हा परिषद बीड श्री कारगुडे व विद्युत विभागाचे वायरमन श्री बहिर यांनी शुक्रवार २८ मार्च रोजी तलावास भेट दिली. शेतकऱ्यास त्यांनी आवाहन केले. त्या आवाहनाला काकडहिरा गावातील शेतकऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन तलावात सोडलेल्या मोटारी काढून घेतल्या. बीड हा तसा दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. उपलब्ध पाणी पिण्यासाठी सांभाळून ठेवणे आवश्यक आहे. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कळविल्यानुसार बीडमध्ये गेल्या पाच वर्षांत भूजल पातळीत संमिश्र वाढ झाली आहे, काही भागात घट झाली आहे तर काही भागात वाढ झाली आहे, विशेषतः २०१२१ च्या पावसाळ्यानंतर. बीड जिल्हा समुद्रापासून दूर आहे. बीड जिल्ह्याचा काही भाग दुर्गम अणि डोंगराळ आहे. जिल्ह्यातील उत्तर भाग सपाट मैदानी आहे. जिल्ह्याच्या मध्य-दक्षिण भागात बालाघाटचे डोंगर आहेत. येथे चिंचोली, नेकनूर हे भाग येतात. या भागास मांजरथडी असेही म्हणतात. मांजरसुभ्याहून बीडकडे जाताना पालीघाट लागतो. गोदावरी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी असून ती जिल्ह्याच्या उत्तर सीमेवरून वाहते. या भागास गंगथडी असेही म्हणतात. हा सुपीक भाग गाळापासून बनला आहे. यात गेवराई, माजलगाव व परळी या तालुक्यांचा समावेश होतो.

जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणतः उष्ण व कोरडे आहे. उन्हाळा मोठा व कडक असतो तर हिवाळा कमी कालावधीचा पण सौम्य असतो. मे महिन्यात तापमान महत्तम असते. डिसेंबर महिन्यात तापमान कमीतकमी असते. उन्हाळ्यात दिवसा तापमान बरेच वाढत असले तरी रात्री ते कमी होते. जिल्ह्याच्या पश्चिम भागातील उंचावरील बालाघाट डोंगराळ प्रदेशातील हवामान काहीसे थंड आहे तर सखल भागात ते उबदार व थोडेसे दमट आहे. अंबेजोगाई तालुक्यातील हवामान आल्हाददायक असल्याचे दिसून येते.

जिल्ह्यात जून ते सप्टेंबर या कालावधील पाऊस पडतो. पावसाचे प्रमाण अतिशय कमी असून पाऊस अनियमित स्वरूपाचा आहे.



त्यामुळे जिल्ह्याचा बराचसा भाग अवर्षणग्रस्त आहे. जो पाऊस पडतो त्याचे जिल्ह्यातील वितरणही असमान आहे. पावसाचे प्रमाण पूर्वेकडून पश्चिमेकडे कमी होत गेलेले आढळून येते. जिल्ह्याच्या पूर्वेकडील अंबेजोगाई, केज, माजलगाव, परळी, धारूर आदी तालुक्यात तो तुलनात्मकदृष्टया अधिक पडतो तर गेवराई, आष्टी, पाटोदा, शिरूर यांसारख्या तालुक्यात तो अधिक कमी पडतो. जिल्ह्यातील गेवराई, पाटोदा, बीड, माजलगाव, केज, आष्टी या तालुक्यांचा केंद्र शासनाने निश्चित केलेल्या अवर्षणप्रवण क्षेत्रात समावेश होतो. येथील लोक दुष्काळाचा सामना करतात. बीड जिल्ह्यात विहिरी, कूपनलिका व नद्या ही पाणीपुरवठ्याची मुख्य साधने आहेत. जिल्ह्यात बीड व आष्टी या भागात विहिरी तुलनात्मकदृष्टया अधिक आहेत. बीड शहरास माजलगाव तलाव व बिंदुसरा तलावातून पाणी पुरवठा होतो.

दुष्काळग्रस्त क्षेत्रे : मराठवाड्यातील बहुतांश भागांप्रमाणेच बीड जिल्हाही दुष्काळग्रस्त म्हणून वर्गीकृत आहे, ज्यामध्ये पाण्याची घटणारी पातळी ही एक मोठी समस्या आहे. काही भागात भूजल पातळीत लक्षणीय घट झाली आहे तर काही तालुक्यांमध्ये पाण्याच्या पातळीत घट होत आहे. २०२१ च्या पावसाळ्यात बीडसह मराठवाड्यात भूजल पातळीत लक्षणीय वाढ झाली. अलीकडील २०२३ मधील आकडेवारीवरून महाराष्ट्रातील काही भागात भूजल संकट वाढत असल्याचे दिसून येते. १६ जिल्ह्यांमध्ये भूजल पातळीत लक्षणीय घट होत आहे.

जिल्ह्याच्या ईशान्य भागात (गेवराई आणि बीड तालुक्यांचा काही भाग) आणि आग्नेय भागात (अंबेजोगाई आणि परळी तालुक्यांचा काही भाग) पाण्याच्या पातळीत घट होत आहे. माजलगाव धरणातील पाण्याची पातळी २०२३ मध्ये अत्यंत कमी होती, मागील वर्षी ५६.४२% च्या तुलनेत फक्त १४.२३ % साठा होता. जिल्ह्याच्या पश्चिम भागात (आष्टी तालुक्यात) देखील पाण्याच्या पातळीत घट होत आहे. काही भागात नायट्रेट दूषिततेमुळे भूजलाची गुणवत्ता प्रभावित होते तर ५०% भूजल नमुन्यांमध्ये दूषितता दिसून येते. सरकारने जलसंवर्धन प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केली आहे, ज्यामध्ये बंधारे बांधणे आणि सूक्ष्म सिंचन व्याप्ती वाढवणे समाविष्ट आहे. तथापि एकंदरीतच बीड जिल्ह्यात बागायती क्षेत्र कमी आहे.

बीड तालुक्यातील मौजे काकडहिरा येथील तलावामधून काकडहिरा व तळेगाव या दोन गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. यावर्षी पाऊस मोठ्या प्रमाणात झाल्याने सदरचा तलाव ओसंडून वाहत होता. परंतु गेल्या दोन ते तीन महिन्यापासून अनेक शेतकऱ्यांनी सदर तलावामध्ये मोटारी टाकून पाणी उपसा सुरु केला होता. त्यामुळे तलावातील पाणी पातळी झपाट्याने कमी झालेली दिसून आली व हा उपसा असाच चालू राहिला तर गावातील जवळपास ३००० जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न व काकडहिरा तसेच तळेगाव येथील नागरिकांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न निर्माण होऊन भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागेल अशी शक्यता निर्माण झाली. भविष्यात निर्माण होणारी पाणीटंचाई कमी करण्यासाठी प्रशासनातर्फे तळ्यातील मोटारी काढून घेण्यात आल्या. शेतकऱ्यांनीही प्रशासनास सहकार्य केले.

यानिमित्त बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी तालुक्यातील जनतेस आवाहन केलेले आहे की जे उपलब्ध पाणी आहे, ते सांभाळणे आवश्यक आहे. अवैधरित्या तलावात मोटरी टाकणे आणि पाण्याचा उपसा करणे ही बेकायदेशीर बाब आहे. अशा मोटारी जप्त करण्यात येतील आणि कायदेशीर कारवाई केली जाईल. त्यामुळे कोणीही अवैधरित्या पाण्याचा उपसा करू नये.

घाटसावळी व ढेकनमोहा येथे ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत उर्वरित शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढावे यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शनिवारी भेट दिली. संजय गांधी योजना, श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांनी डीबीटी प्रक्रिया तहसील कार्यालयात येऊन पूर्ण करावी यासाठी आवाहन केले. स्वस्त धान्य लाभार्थी यांनी ई केवायसी करावी, शेतकरी अनुदान पात्र लाभार्थ्यांनी ई केवायसी करावी असे आवाहन केले. प्रलंबित फेरफार बाबत आढावा घेतला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT